# कल्याण डोंबिवली व्हिजन

Year 09 : Issue 16 : Pages : 4 Kalyan, Dist. Thane : Tuesday 06 Sept. To 12 Sept 2022 : Price 2.00 : RNI. No. MAHBIL/2014/56983

वर्ष : ०९ * अंक : १६ * पाने : ४ कल्याण, जि. ठाणे, * मंगळवार, ०६ सप्टेंबर ते १२ सप्टेंबर २०२२ मूल्य : रु. २.००/- * नोंदणी क्रमांक एमएएचबी आयएल/२०१४/५६९८३


## मुसळधार पावसाचा फटका ढोल-ताशा पथकांवर



मुसळधार पावसामुळे विसर्जन मिरवणूका रद्द

**कल्याण :** कल्याण-डोंबिवलीसह ग्रामीण भागात सुरु असणाऱ्या मुसळधार पावसामुळे गणेशभक्तांकडून गणपती विसर्जनाची मिरवणूक रद्द करुन गणरायाला स्वत:च्याच खासगी वाहनात बसवून थेट विसर्जन तलावाकडे घेऊन जाण्यात येत असल्याने बाप्पाच्या विसर्जन मिरवणुकीत महत्वाची भुमिका बजावणाऱ्या ढोलताशा पथकांवर आर्थिक संकट ओढवले आहे.

त्यामुळे बाहेरगावहून येणाऱ्या ढोलताशा वाजत्र्यांना पावसाने प्रवासासाठी पैसे मिळणार नसल्याने विनातिकीट घर गाठावे लागणार असल्याचे खंत बुलढाणा जिल्ह्यातील ढोलताशा वाजंत्री फकीर थोरात यांनी व्यक्त केली.

## साईनाथ मित्र मंडळ जाधववाडीचा महाराजाचे आगमन उत्साहात

**डोंबिवली :** सालाबाद प्रमाणे यंदाही श्री साईनाथ मित्र मंडळ डोंबिवलीचा मानाचा नवसाला पावणारा जाधव वाडीचा महाराजा जाधव वाडी मध्ये विराजमान झाला आहे.



गेल्या ३१ वर्षापासून जाधववाडीचा महाराजाचे आगमन मोठ्या थाटामाटात व उत्साहात साजरे होते.

यावेळी रक्तदान शिबिर ,नेत्र तपासणी शिबिर, नृत्य स्पर्धा तसेच भाग घेणारे स्पर्धकांना विशेष बक्षीस वितरण देखील करण्यात येते. सत्यनारायणाची महापूजा तसेच भंडाराचे आयोजन देखील करण्यात येते. मंडळाचे अध्यक्ष दिनेश रमेश जाधव हे गेल्या अनेक वर्षापासून शहरामध्ये समाज सेवा करत आहे. गेल्या दोन वर्षापासून दिनेश जाधव यांच्या वतीने रक्तदान शिबिर, कोविड लसीकरण लोकांना मदत करणे इत्यादी कामे या मंडळाच्या माध्यमातून दिनेश जाधव व त्यांचे कार्यकर्त्यांनी केले आहे. तसेच सर्व नागरिकांना गणेश चतुर्थीच्या हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या. व मंडळाच्यावतीने बाप्पा चरणी प्रार्थना करण्यात आली की, येणारे हे वर्ष सुख समृद्धी लाभो कुठल्याही प्रकारचा त्रास लोकांना होऊ नये अशी मनोकामना केली.

## एज्युकेशन टुडे फाउंडेशनच्या वतीने पर्यावरणपूरक गणपती बनवणे कार्यक्रमाचे आयोजन

**कल्याण :** एज्युकेशन टुडे फाउंडेशनच्या वतीने शाळेच्या बहुउद्देशीय सभागृहात २५ ऑगस्ट २०२२ ला पर्यावरण पूरक गणपती बनवणे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत कल्याण परिसरातील ६ शाळांनी सहभाग घेतला. १४० विद्यार्थ्यांच्या सहभागाने १४० गणपतीच्या मुर्त्या बनवण्यात आल्या.

गणपतीच्या विसर्जनाने निर्माण होणारे प्रदूषण व शाळेच्या प्राचार्य राधा मनी यांनी सुद्धा विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी सतीश माने, विपुल दोडके हे मुख्य परीक्षक म्हणून लाभले.

शाळेचे कला शाखाप्रमुख हेमंत मगरदे तसेच आर्य गुरुकुल शाळेचे स्कॉलरशिप मनी नाडर व क्षितिजा भामरे यांनी या कार्यक्रमाची रूपरेषा विद्यार्थ्यांकडून कार्यक्रम व्यवस्थित व शिस्तबद्ध पद्धतीने राबवून घेतला. सेंट मेरीज





समस्या या गोष्टींचा विचार करूनच आर्य गुरुकुल शाळेत एज्युकेशन टुडे फाउंडेशनच्या संयोगाने भरत मलिक सर यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला. त्यांनी गणपती विसर्जनाने होणारे प्रदूषण व समस्येची चर्चा केली व त्यातून हे प्रदूषण टाळण्याचे उपाय सुचवले व त्यावर त्यांनी सर्वांना मार्गदर्शन केले. गणपतीच्या मुर्त्या या शाडूच्या मातीच्याच असाव्यात यावर त्यांनी भर दिला तसेच मनीष व्यापारी प्रसिद्ध मूर्तिकार यांनी सुंदर मूर्ती बनवून मुलांना मार्गदर्शन केले. तसेच कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे नवनाथ ठाकूर यांनी देखील मुलांना मार्गदर्शन करून त्यांचा उत्साह द्विगुणित केला.

एज्युकेशन टुडे फाउंडेशनचे संस्थापक भरत मलिक सर यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले. त्यांनी गणपतीमुळे होणारे जल व ध्वनी प्रदूषण यावर आपले भाष्य केले. मान्यवर नीलम मलिक यांनी आपले मनोगत व्यक्त केले तसेच हायस्कूलचे रवींद्र कुंभार, प्राजक्ता देशमुख, वैभव क्षीरसागर यांचे देखील सहकार्य लाभले. या कार्यक्रमात उपस्थित सर्वांनी पर्यावरण पूरक गणपती बनवण्याचा व आरास करण्याची शपथ घेण्यात आली. विद्यार्थ्यांनी बनवलेल्या या जवळजवळ १४० सुंदर गणेश मूर्तींची शाळेत गणेश चतुर्थीच्या दिवशी स्थापना करून मनोभावे पूजाअर्चा करून पाचव्या दिवशी टाळ मृदंगाच्या गजरात विसर्जन करण्यात येईल आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे विसर्जनाकरिता शाळेतच एक छोटे तळे निर्माण करून त्यातच विसर्जन करण्यात येणार आहे, म्हणजे ती माती वाया न जाता पुन्हा वापरात आणता येऊ शकते. गणपतीला वाहिलेला दुर्वा व फुले निर्माल्याचे खत तयार करण्यात येणार आहे. शिक्षक, १४०० विद्यार्थी व पालक या पाच दिवसाच्या कार्यक्रमासाठी उपस्थित राहणार आहेत. अशा प्रकारे पर्यावरणाचा समतोल राखत प्रदूषण टाळून गुरुकुल शाळेत अतिशय उत्साहात हा कार्यक्रम पार पाडण्यात आला.

## गावदेवी मित्र मंडळ ठाकुर्ली यांचे दहा दिवस गणपती बाप्पाचे आगमन



**कल्याण :** गांव देवी मित्र मंडल ठाकुर्ली इथे सालाबाद प्रमाणे यंदाही गावदेवी मित्र मंडळाचे दहा दिवसीय गणरायाचे आगमन झाले आहे. हा गणेशोत्सव मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात येतो. प्रत्येक दिवशी वेगळ्या वेगळ्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. लहान मुलांसाठी चित्रकला स्पर्धा, नृत्य स्पर्धा आदी अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनाचे विभागाध्यक्ष प्रदीप शरद चौधरी व शारदा प्रदीप चौधरी यांनी नाहर मल्टी स्पेशलिस्ट हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने गावदेवी मित्र मंडळ येथे मोफत आरोग्य तपासणी व औषध उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले. यात सर्दी, ताप, खोकला, अंगदुखी, पोटदुखी, उल्टी, जुलाब अशा अनेक मोफत तपासण्या करण्यात आल्या. मोफत औषध देण्यात आली. प्रदीप चौधरी यांचे वतीने गेल्या अनेक वर्षा पासून समाज सेवा सुरू आहे. लोकांच्या हितासाठी त्यांनी अनेक आंदोलने देखील केले. तसेच ते लोकांसाठी निस्वार्थपणे मदत करत असतात.

## समाजसेवक रोहित भोईर यांच्या घरी दहा दिवसीय गणरायाचे आगमन

**कल्याण :** समाजसेवक उद्योगपती महाराष्ट्र नवनिर्माण सेनाचे रोहित भोईर, संजय भोईर, प्राजक्ता भोईर यांचे निवासस्थानी पारंपरिक पद्धतीने गणपती बाप्पाचे आगमन झाले आहे.



गणपती बाप्पाचे दर्शन घेण्यासाठी विश्वात्मक जंगली महाराज कृपाशिवाय कोकमठाण येथील आत्मा मालिक आश्रम मठ मधील संत पूजनीय श्री साधनानंद महाराज यांचे आगमन झाले. विविध क्षेत्रातील समाजसेवक, उद्योगपती, नगरसेवक यांनी रोहित भोईर यांच्या निवासस्थानी जावून बाप्पांचे दर्शन घेतले. गेले दोन वर्षापासून कोरोनाचे सावट असताना कुठल्या प्रकारचा सण साजरा होत नव्हता मात्र यावर्षी लोक आनंदाने हा सण साजरा करत आहे.

रोहित भोईर हे नेहमी समाजामध्ये समाजकार्यात सक्रिय आहेत. कोरोनाच्या काळामध्ये व अनेक वेळी त्यांनी लोकांची मदत केली आहे. सर्वांना सुख समृद्धी लाभो अशी बाप्पा चरणी प्रार्थना रोहित भोईर यांच्यातर्फे करण्यात आले.

## लालचंद पाटील व अरविंद पाटील यांचे निवासस्थानी दहा दिवसीय गणपती बाप्पाचे आगमन

**कल्याण :** सालाबाद प्रमाणे यंदाही लालचंद पाटील व अरविंद पाटील यांचे निवासस्थानी दहा दिवसीय गणपती बाप्पाचे आगमन झाला आहे तसेच दहा दिवस गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो.



गेल्या ३४ वर्षापासूनहा गणेशोत्सव पाटील कुटुंब तर्फे साजरा करण्यात येतो. दर्शन घेण्यासाठी मोठया संख्येने गणेश भक्त पाटील कुटुंबियांच्या निवासस्थानी गर्दी करतात. नाचत गात भक्ती भावाने हे दहा दिवस आनंदाने साजरे करण्यात येते. यावेळी पाटील कुटुंबियातर्फे बाप्पा चरणी प्रार्थना करण्यात आली की गेल्या दोन वर्षापासून कोरोनाचा सावट असल्याने कुठल्याही प्रकारचा सण साजरा झाला नाही. मात्र यावर्षी हा सण मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. तसेच पाटील कुटुबियांतर्फे सर्व नागरिकांना गणेशोत्सवाच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

## श्री ओम सिद्धिविनायक वृद्धाश्रमास सामाजिक बांधिलकीतून क्राईम रिपोर्टर वेल्फेअर असोसिएशनने दिले गृहपयोगी साहित्य

**अंबरनाथ :** क्राईम रिपोर्टर वेल्फेअर असोसिएशन (एनजीओ) सामाजिक संस्था आपले सामाजिक उत्तरदायित्व पार पाडत असताना अंबरनाथ येथे मागच्या वर्षी सुरु झालेले वृद्धांसाठी कुठल्याही प्रकारचे शुल्क न आकारता वृद्धांची काळजी घेणारे श्री ॐ सिद्धिविनायक फाउंडेशनचे वृद्धाश्रम कार्यरत असल्याचे समजले असता



या ठिकाणी अंबरनाथ शिवाजी पोलीस स्टेशन चे स. पो.निरी. जयेंद्र भोयर यांच्या मार्गदर्शनाखाली पो. शि. दादासाहेब वाघमारे व पो. ना. कैलास पारधी, निलेश सांगळे यांच्या मदतीने अंबरनाथ परिसरातील वृद्धाश्रम , अनाथालय यांना राजेंद्र वखरे यांनी भेट दिली असता श्री ॐ सिद्धिविनायक वृद्धाश्रमास साहित्याची व मदतीची गरज असल्याचे ओळखून (सी.आर.डब्ल्यू.ए) एनजीओ तर्फे वृद्ध आजी आजोबांना जेवणासाठी लागणारे ताट (भांडी) स.पो.नि. जयेंद्र भोयर यांच्या हस्ते वृद्धाश्रमाच्या संचालिका विजयालक्ष्मी बसनगार,बनश्री बिश्वास,देवकी चलवादी (आजी),. लक्ष्मी (आजी) व वृद्धाश्रमातील आजी यांना सुपूर्द करून सामाजिक बांधिलकी जपली.

यावेळी अंबरनाथ शिवाजीनगर पोलीस स्टेशनचे पो.उप.निरी . तुळशीराम सावंत,पो.शि. दादासाहेब वाघमारे,पो.ना.कैलास पारधी, पो. ना.निलेश सांगळे , यांच्यासह फणसीपाडा येथील समाजसेवक विलास खरे व एनजीओ तर्फे सीमा वखरे, नितीन सैद, सौ.चित्रा कामत,रमेश काठे ,मुकेश म्हात्रे, सोनाली झोडगे,फकीरबा नेव्हार, संतोष कोलंबकर आदि उपस्थित होते.




# वैश्य समाज युवक गणेशोत्सव मंडळातर्फे ९५ वे वर्षे उत्सवात संपन्न





**कल्याण :** जुनी ऐतिहासिक परंपरा लाभलेले शहर कल्याण मधील दूध नाका परिसरामधील लक्ष्मीनारायण देवस्थान मंदिर येथे वैश्य समाज युवक मंडळाकडून गणेश उत्सव साजरा केला गेला. यंदाचे हे ९५ वर्ष आहे. विशेष म्हणजे लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सव सुरुवात केल्यानंतर पुणे कल्याण हे शहरांमध्ये सार्वजनिक गणेशोत्सव मेळा संघाची स्थापना झाली आणि हिंदू संस्कृतीचे आणि समाज बांधव एकत्र येण्यासाठी या संकल्पनेची मूहूर्तमेढ लोकमान्य टिळकांनी सुभेदार वाडा येथे स्वत: श्री गणेशाची स्थापना करून केली.

या गणेशोत्सवानिमित्त कल्याण मध्ये एकादशी आठव्या दिवशी विसर्जन होते व दहाव्या दिवशी पुण्यामध्ये होते. या दोन्ही शहरांमधील गणपती गणेशभक्तांना बघायला मिळावे म्हणून लोकमान्य टिळकांनी मेळा संघाची स्थापना करण्यात आली.

वैश्यवाणी समाज हा कल्याण शहरात आणि आजूबाजूच्या गावांमध्ये स्थायिक असून दूध नाका परिसरामध्ये पूर्वी वाणी समाजाची वस्ती होती तेव्हा वाणी गल्ली म्हणून संबोधले जात असत. वाणी समाजाचे कल्याण मध्ये व्यापारी व त्याचबरोबर सामाजिक क्षेत्रामध्ये आजही कल्याणमध्ये स्थान आहे. दरवर्षीप्रमाणे यावर्षीही ९५ वर्ष गणेशउत्सव हा सण साजरा करण्यात आला यावर्षी प्रशांत शेटे हे मंडळाचे अध्यक्ष होते. मेळा संघांमध्ये वैश्य समाज मंडळाला विशेष स्थान असून सांस्कृतिक, सामाजिक शिस्तबद्धता, पारंपारिक वेशभूषांमध्ये विसर्जन सोहळा पार पाडण्याचे उत्कृष्ट पारितोषिक ही शासनाकडून मिळाले आहेत.

त्याचबरोबर गोकुळ अष्टमी ,रामनवमी, एकादशी, कीर्तन भंडारा, समाजामधील गुणवंत व्यक्तींचा गुण गौरव, महिलांचे विविध कार्यक्रम, स्पर्धा ,असे विविध कार्यक्रम राबवले जातात. ठाणे जिल्हा महाराष्ट्र वैश्य समाज सांघाचे अध्यक्ष विजय वसंत निकते व संघाचे पदाधिकारी, मान्यवर, समाजामधील समाज बांधव मोठ्या प्रमाणात विसर्जनात पारंपारिक वेशभूषा मध्ये सहभागी असल्याची माहिती ठाणे जिल्हा महाराष्ट्रीय वैश्य समाज संघाचे कल्याण शहर गटसभापती प्रथमेश प्रशांत पुण्यार्थी यांनी दिली.

# घोडविंदे कुटुंबीयांच्या घरी श्री गणरायाचे आगमन मोठ्या उत्साहात





**कल्याण :** दरवर्षीप्रमाणे यावर्षीही घोडविंदे कुटुंबीयांच्या घरी श्री गणरायाचे आगमन मोठ्या उत्साहात झाले. गेल्या दोन वर्षापासून कोणतेही सण साजरे करता आले नाही पण ह्यावर्षी सर्व निर्बंध हटवण्यात आल्यामुळे गणेशोत्सव हा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सहा दिवस गणेशाची मनोभावे पूजा अर्चा करण्यात आली.

यावेळी सहाय्यक अभियंता महावितरण तुकाराम गोपाल घोडविंदे, आदिती तुकाराम घोडविंदे, उद्योजक समाजसेवक निलेश गोपाळ घोडविंदे, नेहा निलेश घोडविंदे यांनी आलेल्या सर्व मान्यवर, मित्रपरिवार, नागरिकांचे स्वागत केले. श्री गणेशाजवळ प्रार्थना केली की सर्वांना सुख-समृद्धी लाभू दे. श्री गणेशाचे विसर्जना वेळी सर्वांचे डोळे भरून आले.

# माजी सभापती जनार्दन म्हात्रे यांच्या घरी दहा दिवस गणपती बाप्पाचे आगमन

**डोंबिवली :** माजी सभापती जनार्दन म्हात्रे व माजी नगरसेविका रेखा जनार्दन म्हात्रे तसेच कल्याण सेना युवाचे राहुल म्हात्रे यांचे निवासस्थान गणपती बाप्पाचे आगमन धुमधडाक्यात साजरा करण्यात आला. भक्तीभावाने दहा



दिवस हा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो. तसेच यावेळी राहुल म्हात्रे यांनी सांगितले की गेल्या दोन वर्षापासून कोरोणाचे संकट असल्याने कुठल्याही प्रकारचे सण साजरे करता आले नाही.मात्र यावर्षी सर्व निर्बंध हटवण्यात आल्यामुळे सर्वसन साजरे करता येणार आहे.

यावेळी सागर दुबे,माजी सभापती जनार्दन म्हात्रे, माजी नगरसेविका रेखा म्हात्रे, राहुल म्हात्रे, यांनी आलेल्या सर्व मान्यवरांचे स्वागत केले. दर्शन घेण्यासाठी नातेवाईक, मित्रपरिवार, शिवसेना कार्यकर्ते, पदाधिकारी इतर मान्यवर उपस्थित होते.यावेळी म्हात्रे कुटुंबांनी सर्व नागरिकांना गणेश उत्सवाच्या शुभेच्छा दिल्या.

**संस्थापक संपादक : राजेंद्र वखरे**
**संपादक : महादेव पंजाबी**
**उप संपादिका : वैष्णवी माळी**

पीआरबी कायद्यानुसार संपादकीय व वृत्तपत्रातील मजकुर, जाहिरातीची कायदेशीर संपूर्ण जबाबदारी महादेव पंजाबी यांच्यावर राहील. कायदेशीर बाबीसाठी न्यायक्षेत्र कल्याण.

साप्ताहिकात प्रकाशित झालेल्या वृत्त व इतर मजकूराबाबत काही वाद असल्यास साप्ताहिक प्रकाशित झालेल्या तारखेपासून पंधरा दिवसाच्या आत संबंधितांनी त्याची नोंद घ्यावी. त्यानंतर आलेल्या तक्रारीची जबाबदारी व्यवस्थापनाची नसेल. तसेच वार्ताहर, लेखक यांच्या मताशी संपादक व व्यवस्थापन जबाबदार असेलच असे नाही.

# वडवली गावचे गाव प्रमुख नवनाथ पाटील यांचे निवासस्थानी दहा दिवसीय गणपती बाप्पाचे आगमन



**मोहोने :** सालाबाद प्रमाणे यंदाही वडवली गावचे गाव प्रमुख नवनाथ शेठ पाटील यांचे निवासस्थानी दहा दिवसीय गणपती बाप्पाचे आगमन झाले असून दहा दिवस भक्ती भावाने आरती करत हा गणेशोत्सव उत्सवात साजरा करण्यात येतो. नवनाथ पाटील यांच्या घरी विराजमान झालेल्या बाप्पाचे दर्शन घेण्यासाठी उद्योगपती समाजसेवक, आजी माजी नगरसेवकांनी दर्शन घेतले.

नवनाथ पाटील हे समाजसेवेमध्ये सक्रिय असतात. कुठल्याही प्रकारची समस्या असो ते लोकांसाठी नेहमी मदतीचा हात देतात. निस्वार्थ काम करणारे समाजसेवक नवनाथ पाटील यांनी कोरोना काळामध्ये देखील लोकांची भरपूर मदत केली. गेल्या दोन वर्षांपासून कोरोनाचे सावट असल्याने कुठलेही सण साजरा होत नव्हते. मात्र यावर्षी कोरोनाचा प्रभाव कमी असल्याने गणेशोत्सव साजरा करत आहेत. नवनाथ पाटील यांच्यावतीने सर्व नागरिकांना गणेशोत्सवाच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

वडवली ग्रामस्थ सर्व एकत्र येऊन गणेशोत्सव मोठ्या थाटात माठात साजरा करतात. तसेच बाप्पा चरणी प्रार्थना करण्यात आली की लोकांना सुख-समृद्धी यश लाभो. तसेच हरिपाठ भजन कीर्तन तसेच हरिभाऊ भंडारी यांचे देखील संगीत भजन चा कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे.






# सुशांत दिलीप जोशी, यांच्याघरी गणेशाचे आगमन

सुशांत दिलीप जोशी, यांच्याघरी गणेशाचे आगमन झाले. गेल्या दोन वर्षापासून कुठलाही प्रकारचे सण साजरे करण्यात आले नव्हते. मात्र यावर्षी सर्व सण उत्साहाने साजरा होत आहेत. तसेच सुशांत जोशी कुटुंबातर्फे सर्व नागरिकांना, गणेशोत्सवाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. तसेच बाप्पा चरणी प्रार्थना करण्यात आली की लोकांना सुख-समृद्धी यश लाभो.

# सार्वजनिक सेवा विचार मंडळातर्फे सार्वजनिक गणेशोत्सवाचे आयोजन

**कल्याण :** सार्वजनिक सेवा विचार मंडळ गणेशोत्सव भोईर कॉलनी बेतुरकर पाडा कल्याण पश्चिम येथे दरवर्षीप्रमाणे यावर्षीही मोठ्या उत्साहात गणेशोत्सव साजरा करण्यात आला. गेल्या दोन वर्षापासून कोरोना असल्याकारणाने कोणतेही सण साजरे करता आले नाही. पण यावर्षी मोठ्या उत्साहात गणेश उत्सव साजरा करण्यात आला. यावेळी 'भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव वर्ष' देखावा सादर करण्यात आला. सार्वजनिक सेवा विचार गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष योगेश तुपे, उपाध्यक्ष अनिल





सोनवणे, प्रमुख सल्लागार नंदकुमार देशमुख, सचिव योगेश सोहनी, सहसचिव राजेश जोशी, खजिनदार अजय चौधरी, निलेश खंडागळे, भगवान बाविस्कर, समाजसेवक सचिन शिरसाठ, मुकुंद शेळके, चंद्रकांत पोद्दार, यशवंत लांडगे, चंद्रकांत नवले, राजेश भालेराव, रमेश गवळी, नाना पगारे, महेंद्र बाविस्कर, विजय रसाळकर, चेतन राणे, मुकेश भालेराव, गणेश सोनी, प्रशांत कदम, राजू नवले, चंद्रकांत शर्मा, संजय सोनवणे, परेश जोशी, बापू बाविस्कर, दशरथ मोरे, कृष्णा चव्हाण तसेच सर्व सल्लागार कार्यकर्ते, सभासद व समस्त नागरिक मोठ्या संख्येने दर्शनासाठी उपस्थित होते.

यावेळी सत्यनारायण महापूजेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सर्व पक्षीय मान्यवर उपस्थित होते. गणेशोत्सवानिमित्त मंडळात आणि हळदीकुंकू कार्यक्रमाचेही आयोजन करण्यात आले होते.

# संदीप टावरे यांच्या घरी गणपती उत्सवाचे आयोजन



**कल्याण :** सालाबाद प्रमाणे यंदाही टावरे निवास गौरीपाडा रोड, शिवसेना शाखेसमोर, श्रुती कॉम्प्लेक्स जवळ गौरीपाडा तलाव जवळ कल्याण पश्चिम येथे संदीप तावरे यांचे निवासस्थानी गणपती बाप्पाचे आगमन झाले. भक्ती भावाने दहा दिवस हा उत्सव आनंदाने साजरा होत आहे. विशेष म्हणजे आजादी का अमृत महोत्सव या उद्देशाने दिल्लीचा लाल किल्ला देखावा यावेळी संदीप तावरे यांचे घरी विराजमान झाले आहे.

गेल्या दोन वर्षापासून कुठलाही सण उत्साहात साजरा करण्यात आले नव्हता मात्र यावर्षी सर्व उत्सव उत्साहाने साजरा होत आहे तसेच टावरे कुटुंबातर्फे सर्व नागरिकांना, ग्रामस्थांना शुभेच्छा देण्यात आले. संदीप टावरे व नितीन टावरे यांच्या वतीने सतत प्रभागांमध्ये समाजकार्य केले जाते. कुठल्याही प्रकारची समस्या असो ते नेहमी लोकांचे मदतीला धावत असतात तसेच डेकोरेशन व सजावट संदीप टावरे, नितीन टावरे, योगेश नवले यांच्या वतीने करण्यात आले तसेच या कार्यक्रमास महिलांनी आपले पारंपारिक नृत्य देखील उपस्थित केले.

# कुणाल कछवाय कुटुंबात गणपतीचे आगमन जल्लोषात



**कल्याण :** गेल्या पंधरा वर्षापासून कछवाय कुटुंबाकडे श्री गणेशाचे आगमन मोठ्या धुमधडाक्यात करण्यात येते. गेल्या दोन वर्षापासून कोणतेही सण साजरे करता आले नाही. पण या वर्षी मोठ्या उत्साहात सर्व सण साजरा करण्यात आले.

यावेळी संपूर्ण कुटुंब नातेवाईक मित्रपरिवार उपस्थित होते. कुणाल मगन कछवाय हे दरवर्षी गणपतीचे डेकोरेशन स्वत:च करतात. यावेळी आलेल्या मान्यवरांचे कुणाल कछवाय यांनी स्वागत केले.

# काशिनाथ पाटील यांच्या निवासस्थानी गणरायाचे जल्लोषात आगमन





**डोंबिवली :** काटई गाव चे माजी उपसरपंच काशिनाथ कान्हा पाटील यांच्या निवासस्थानी मोठ्या उत्साहात गणरायाचे आगमन झाले. यावेळी काशिनाथ पाटील यांच्याकडे गणेशाचे दर्शन घेण्यासाठी अनेक मान्यवर उपस्थित होते. एन आर एम यू महामंत्री वेणू नायर सर, राजन लोढा, समाजसेवक भाजपाचे कार्यकर्ते संदीप माळी, आमदार राजू दादा पाटील यांचे भाऊ विजय पाटील, विनोद दादा पाटील, क्रांती पाटील, तुषार पाटील, तकदीर काळण, शरद पाटील, हरीश जोशी, विजय पाटील, विजय भोईर, हनुमान ठोंबरे व मनसेचे सर्व कार्यकर्ते पदाधिकारी मान्यवर यावेळी श्री गणरायाच्या दर्शनासाठी उपस्थित होते.

यावेळी काशिनाथ पाटील यांनी आलेल्या मान्यवरांचे आभार व्यक्त केले. काशिनाथ पाटील नेहमीच समाजकार्य करत असतात. नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी तत्पर असतात. प्रभागातील कोणत्याही समस्या असो त्या सोडवण्यासाठी कार्यशील असतात. तसेच आपल्या प्रभागात अनेक शिबिराचे आयोजन केले. यावेळी काशिनाथ पाटील यांनी सर्व नागरिकांना गणेशोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या.

# महाराष्ट्र प्रदेष सचिव महिला मोर्चा प्रिया शर्मा यांचा वाढदिवस उत्साहात साजरा



**कल्याण :** भारतीय जनता पार्टी कल्याण शहर महाराष्ट्र प्रदश सचिव महिला मोर्चा प्रिया कमलेष शर्मा यांचा वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी प्रिया शर्मा यांचा वाढदिवस अनेक सामाजिक उपक्रमातून साजरा करण्यात आला. तसेच अनेक पक्षातील मान्यवरांनी आपली हजेरी लावली. यावेळी आलेल्या नागरिकांनी प्रियाताई यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. प्रिया ताई षर्मा यांनी आलेल्या सर्व मान्यवरांचे आभार मानले. गेले अनेक वर्षापासून ते समाजकार्य करत आहेत.

यावेळी महिला कार्यकर्त्या, हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कल्याणमध्ये तृतीयपंथीयांकडून गरीब थालीचा शुभारंभ

**प्रतिनिधी | कल्याण**

कल्याणमध्ये 'तृतीय पंथीयां'च्या ख्वाहिश फाऊंडेशनच्या वतीने गरीब थाली सुरु करण्यात आली आहे. या गरीब थाली केंद्राचा शुभारंभ आज ठाणे जिल्हाधिकारी राजेश नार्वेकर यांच्या हस्ते करण्यात आला. दहा रुपयात थाली आणि एक रुपयामध्ये नाश्ता दिला जाणार आहे. असा हा उपक्रम ठाणे जिल्ह्यात नव्हे तर महाराष्ट्रात पहिल्यांदाच असल्याचे तहसीलदार जयराम देशमुख यांनी सांगितले.

या गरीब थाली शुभारंभ प्रसंगी फाऊंडेशनच्या संस्थापकीय अध्यक्षा तमन्ना मन्सूरी, सल्लागार पूनम सिंग, रिपाईचे अण्णा रोकडे, भीमराव डोळस आदी मान्यवर उपस्थित होते. तृतीय पंथीयांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी हा गरीब थाळीचा पथ दर्शी प्रकल्प सुरु करण्यात आला आहे. या गरीब थाळी केंद्राच्या माध्यमातून आदीवासी, गरीब गरजू विधवा माहिला आणि तृयीत पंथीय यांना रोजगाराची संधी उपलब्ध करुन देण्यात आली आहे. फाऊंडेशनच्या माध्यमातून सात तृतीय पंथीय बारावीची आणि तीन जण बी.कॉमची परिक्षा देणार आहेत. किन्नर, गरजू, विधवा आणि आदीवासी निराधारांना आसरा नाही. त्यांच्याकरीता मुरबाड येथे दहा एकर जागा आहे. त्या ठिकाणी निवारा उभा करण्याकरीता बांधकाम साहित्याची गरज आहे. ते देण्याची व्यवस्था करण्यात यावी, अशी मागणी अध्यक्षा तमन्न मन्सुरी यांनी यावेळी केली.

जिल्हाधिकारी नार्वेकर यांनी सांगितले की, तृतीय पंथीयांचा हा पथदर्शी प्रकल्प आहे. त्यांना रेशन कार्ड, आधार कार्ड आणि मतदान ओळखपत्र देण्याचे काम सुरु आहे. राज्यभरातून ठाणे जिल्ह्यात ७८२ तृतीय पंथीय मतदारांची नोंदणी करण्यात आली आहे. ठाणे जिल्हा हा तृतीय पंथीय मतदारांची नोंदणी करण्यात अव्वल ठरला आहे. आधारकार्ड आणि रेशनिंग कार्ड नोंदणीकरीता फाऊंडेशनने सहकार्य केल्यास त्याला सरकारी यंत्रणेला जास्त उपयोग होऊ शकतो. त्याचबरोबर ६५ वर्षीय तृतीय पंथीयांना संजय गांधी निराधार योजनेच्या अंतर्गत मानधन देण्याचा प्रस्ताव तयार करण्यात येणार असल्याचे नार्वेकर यांनी यावेळी सांगितले. मुरबाड येथील फाऊंडेशनच्या ड्रीम प्रोजेक्टसाठी दानशूर व्यक्तींकडून मदत मिळवून देणार असल्याचे नार्वेकर यांनी आश्वासित केले. तर अशा प्रकारे उपक्रम राबविण्याचा मान कल्याण तालुक्याला मिळाल्याने हा ऐतिहासिक कल्याण नगरीच्या शिरपेचात मानाचा तुरा असल्याचे मत तहसीलदार जयराज देशमुख यांनी व्यक्त केले.



# समाजसेवक उद्योगपती एकनाथ म्हात्रे यांचे घरी गौरी गणपती बाप्पाचे आगमन

**कल्याण :** समाजसेवक व उद्योगपती एकनाथ म्हात्रे यांचे निवासस्थानी सालाबाद प्रमाणे यंदाही गौरी गणपतीचे आगमन झाले असून हा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा होत आहे.

गेल्या दोन वर्षापासून कोरोनाचे सावट असल्याने हा उत्सव निर्बंध घेऊन करावे लागले मात्र यावर्षी हे सर्व निर्बंध उठवण्यात आले आणि सर्व राज्यात हा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. बाप्पाचे दर्शन घेण्यासाठी सर्व राजकीय पक्ष समाजसेवक उद्योगपती यांनी आपली हजेरी लावली तसेच समाजसेवक उद्योगपती एकनाथ म्हात्रे व जनार्दन म्हात्रे यांच्यावतीने सर्व नागरिकांना गणेश उत्सवाच्या शुभेच्छा देण्यात आल्या व हे वर्ष सर्वांना सुख समृद्धीचे जावो अशी देवा चरणी प्रार्थना करण्यात आली.



# कुणाल भोईर व समस्त भोईर परिवारातर्फे गणेशोत्सव उत्साहात साजरा



**कल्याण :** परंपरेनुसार कुणाल भोईर व त्यांचे कुटुंबिय गणेशोत्सव मोठया उत्साहात साजरा करतात. यावेळी सर्व कुटुंबिय एकत्र येवून हा सण साजरा करतात. सर्व कुटुंब मिळून एकच गणपती बसवतात. आणि हीच परंपरा चालू राहील. असे यावेळी कुणाल भोईर यांनी सांगितले. तसेच त्यांनी नविन पिढीला संदेश दिला की आपण सर्वांनी एकत्र मिळून हा सण साजरा करा.

यावेळी कुणाल सुरेश भोईर, प्रणय संजय भोईर, मंथन राजेंद्र भोईर, अमोल अशोक गायकवाड, राजेंद्र भोईर, संजय भोईर, सुनिता भोईर, रजनी भोईर, रेखा भोईर, सुविधा भोईर, अंकीता भोईर, श्रुती, श्रध्दा, तुषार, प्राची उपस्थित होते.




# विशेष कार्यकारी अधिकारी सुरेश काळे यांच्या घरी गणपती बाप्पांचे आगमन

**कल्याण :** सालाबाद प्रमाणे यावर्षी सुद्धा साई समर्थ अपार्टमेंट बी विंग तिसरा मजला गणेशवाडी येथे वसंत आबाजी काळे, सुरेश काळे, गणेश काळे यांच्या यांचे घरी गणपती बाप्पाचे आगमन झाले. गेल्या अनेक वर्षांपासून ही परंपरा काळे कुटुंबीयतर्फे आयोजित करण्यात येत आहे. मागील दोन वर्षापासून कोरोनामुळे कोणतेही सण साजरे करता आले नाही. मात्र यावर्षी कोरोनाचा प्रभाव कमी झाल्याने यावर्षी गणेशउत्सव मोठ्या थाटामाटात व उत्साहात साजरा करण्यात येत आहे तसेच काळे कुटुंबातर्फे बाप्पा चरणी प्रार्थना करण्यात आली की हे वर्ष सर्वांना सुख समृद्धी लाभो व यश लाभो अशी मनोकामना देखील केली. या प्रसंगी काळे कुटुंबीय एकत्रित येऊन हा उत्सव उत्सव साजरा करत आहेत.



# कल्याणमधील हॉस्पिटॅलिटी इंडस्ट्रीमध्ये कौशल्य विकासाची सुवर्ण संधी




**कल्याण :** अचिव्हर्स स्कूल ऑफ इनोव्हेशन अँड एंटरप्रेन्युअरशिपने कामथ हॉस्पिटॅलिटी अॅकॅडमी ऑफ स्कीलच्या संयुक्त विद्यमाने आणि मुंबई विदयापीठांतर्गत कल्याणमधील VITS कामथ ग्रुपचे युवा अध्यक्ष डॉ. विक्रम आणि प्रीती कामथ यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांना व्यावहारिक आणि औद्योगिक कौशल्य प्रशिक्षण दिले. सोबतच देशाच्या विकासासाठी प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटन अध्यक्ष सी.ए. डॉ. महेश भिवंडीकर, सी.ए. गौरांग भिवंडीकर व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत झाले.

# दीड दिवसीय गणपती बाप्पांचे विसर्जन गौरी पाडा तलावत उत्साहात संपन्न

**कल्याण :** सालाबाद प्रमाणे यंदाही भारतीय जनता पार्टी कल्याण पश्चिम येथील गौरीपाडा तलाव येथे दीडशे गणपतीसाठी अल्पोहारचे मोफत वाटप करण्यात आले.

तसेच यावेळी भारतीय जनता पार्टीचे शहराध्यक्ष प्रेमनाथ म्हात्रे यांनी सर्व नागरिकांना गणेशोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या तसेच कोरोनाचा प्रभाव कमी जरी झाला असेल तरी तो गेलेला नाहीये, लोकांनी आपली काळजी घ्यावी लहान मुलाकडे लक्ष द्यावे, गर्दी टाळावी असं आव्हान देखील केले.

आलेले सर्व भक्तांचे प्रेमनाथ म्हात्रे व भगवान म्हात्रे यांच्या वतीने आभार मानण्यात आले. कार्यक्रमाप्रसंगी लक्ष्मण म्हात्रे, रोहिदास म्हात्रे, समीर मोरया, सरोदे सर, राम मराठे, सीमा सिंग तसेच भारतीय जनता पार्टीचे सर्व पदाधिकारी कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

# डोंबिवली मध्ये साकारला ड्रायफ्रूट चा बाप्पा

**डोंबिवली :** डोंबिवली पश्चिमेकडील जय हिंद कॉलनीत राहणारे कॉंग्रेसचे माजी नगरसेवक हृदयनाथ भोईर व नगरसेविका हर्षदा हृदयनाथ भोईर हे गेल्या ३५ वर्षापासून आपल्या निवासस्थानी गणेशाची स्थापना करतात. गेल्या पंधरा वर्षापासून त्यांनी इको फ्रेंडली संकल्पना राबवली आहे. यंदा त्यांनी घरगुती गणपतीची संकल्पना केली. यामध्ये काजू, बदाम, आदी ड्रायफ्रूट्सचा समावेश केला आहे. यावेळी इको फ्रेंडली मूर्तीची स्थापना करुन पर्यावरणाबाबत जनजागृती करावी असे आवाहन हृदयनाथ भोईर यांनी केले तसेच ही सजावट सचिन भोईर यांच्या सहकार्याने केली आहे.

# २०२२-२३ ची महिला मंडळातर्फे प्रिया शर्मा यांची नियुक्ती



**कल्याण :** महाराष्ट्र प्रदेश सचिव महिला मोर्चा अध्यक्ष प्रिया शर्मा यांनी कल्याण शहरातील सर्व नागरिकांना गणेशोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या.कल्याण जिल्हा सार्वजनिक महिला महामंडळच्या वतीने प्रिया शर्मा यांची अध्यक्षपदी निवड करण्यात आली.

यावेळी महिला महामंडळातर्फे कार्यालयाचे उद्घाटन करुन सर्व महिलांचा पदनियुक्ती सोहळा कार्यक्रमाचे आयोजन केले. या नविन चांगल्या कार्याची सुरुवात भजनाने केली आहे.

२०२२-२३ ची महिला मंडळातर्फे प्रिया शर्मा यांची नियुक्ती करण्यात आली. याबद्दल प्रिया शर्मा यांनी कल्याणमधील सर्व गणेशोत्सव मंडळाचे आभार मानले. सर्वांचे सन्मान करण्यात संधी मिळाली आहे. त्याचे औचित्य साधून तसचे महिलांही काहीतरी वेगळे करु शकतात आणि चांगल्या प्रकारचे कार्यक्रम राबवू शकतात. व ते दाखवण्याचा प्रयत्न मंडळाकडून होईल असे प्रिया शर्मा यांनी सांगितले.

कोरोनामुळे गेली २ वर्षे कोणत्याही प्रकारचे सण साजरे केले गेले नव्हते परंतु आता मात्र सर्व सण उत्साहाने साजरे केले जातात. यावेळी महिलाही मोठ्या उत्साहाने कार्यक्रमात भाग घेताना दिसत आहेत.

यावेळी महिलांसाठी मोदक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये तीन पारितोषिके ठेवण्यात आली. प्रथम पारितोषिक सोन्याची नथ, द्वितीय पारितोषिक पैठणी, तर तृतीय पारितोषिक सिल्व्हर कोटेड ड्रायफ्रुट बॉक्स अशी पारितोषिके ठेवण्यात आली. तर इतर महिलांसाठी लकी ड्रॉ कुपन ठेवण्यात आले आहे. तसेच महिलांच्या मनोरंजनासाठी मंगळागौर कार्यक्रम देखील आयोजित केला आहे.

महिलांचा सन्मान व्हायला पाहिजे हीच भावना मनात ठेवून तसेच कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी मंडळाची संस्थापिका मनिषा केदारे यांनी मेहनत घेतली.

यावेळी अश्विनी धुमाळ, मिनाक्षी डोईफोडे, माजी अध्यक्षा शितलताई विखणकर, विजया जाधव, सुनिता राठोड, डिंपल दहीफुले, सविता नलावडे उपस्थित होत्या.

# प्रतिक पाटील यांचा वाढदिवस उत्साहात साजरा



**कल्याण :** युवासेना कल्याण तालुका अधिकारी प्रतिक नामदेव पाटील यांचा वाढदिवस ३ सप्टेंबर रोजी प्रभाग क्र. ३६ येथे त्यांच्या जनसंपर्क कार्यालयात उत्साहत साजरा करण्यात आला.

प्रतिक पाटील हे नेहमीच आपल्या प्रभागात समाजोपयोगी कार्यक्रम राबवत असतात. ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण या अनुषंगाने प्रतिक पाटील समाजामध्ये सक्रीय आहेत.

यावेळी प्रतीक पाटील यांनी आलेली सर्व नागरिकांचे मनापासून आभार व्यक्त केले. की तुम्ही जो माझ्यावर विश्वास ठेवला आहे तो असाच मी कायम ठेवेल.यावेळी वागंनी बदलापूर चे उद्योगपती दीपक चव्हाण, समाजसेवक रजत राजन, पंढरीनाथ म्हात्रे, संजीव ताम्हाने, उपविभाग प्रमुख ललित गुप्ता, सत्यजित रॉय, युवासेना उपतालूका आधिकारी सुरज जाधव, उपशहर प्रमुख अभिजीत थरवळ, शाखा प्रमुख लक्ष्मीकांत आंबेकर, उपविभाग प्रमुख कुणाल पवार, माजी महिला उपशहर संघटक वंदना बेल्हेकर, शाखा प्रमुख अंकित जाधव, जेष्ठ शिवसैनिक नाना शिंदे, शामसुन्दर पाटिल, सोनाल मुंडेकर स्थानीक रहीवासी, शिवसैनिक, युवासैनीक व व्यापारी उपस्थीत होते.

# परिवहन माजी सभापती संजय पावशे यांच्या घरी पाच दिवसीय गणपती बाप्पाचे आगमन

**कल्याण :** कल्याण डोंबिवली परिवहन माजी सभापती संजय पावशे यांच्या घरी पाच दिवस गणपती बाप्पाचे त्यांच्या निवासस्थानी आगमन झालेले आहे.

गेल्या दोन वर्षापासून कोरोना असल्या कारणाने कोणतेही सण साजरे करता आले नाही. पण ह्या वर्षी सर्व निर्बंध हटवल्याने आपल्याला सण साजरे करता येणार आहे. भक्तिभावाने उत्साहात साजरा करण्यात येतो तसेच लोकांना सुख समृद्धी लाभो अशी देवा चरणी प्रार्थना संजय पावशे यांनी केली . संजय पावशे नेहमीच आपल्या प्रभागात अनेक समाज उपयोगी कार्यक्रम राबवित असतात. नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी नेहमी तत्पर असतात.



# श्री साई साळुंखे मित्र मंडळ येथे गणपती बाप्पाचे आगमन

**कल्याण :** सालाबाद प्रमाणे यंदाही श्री साई साळुंखे मित्र मंडळ येथे गणपती बाप्पाचे आगमन मोठ्या थाटात माटात विराजमान झाले आहे. गेल्या अनेक वर्षापासून श्री साई साळुंखे मित्र मंडळाचे संस्थापक उमेश साळुंखे यांच्यावतीने भक्ती भावाने हा उत्सव साजरा करण्यात येतो. विशेष म्हणजे सर्व जाती धर्माचे लोक यात समावेश होऊन हा उत्सव साजरा करतात. उमेश साळुंखे यांच्यावतीने महाप्रसादाचे आयोजन देखील करण्यात आले. यात शेकडो संख्येने नागरिकांनी सहभाग घेऊन भंडाराचा लाभ घेतला. गेल्या दोन वर्षांपासून कुठलेही प्रकारचे सण साजरे करता आले नाही. मात्र यावर्षी सर्व सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आले.

यावेळी साळुंके कुटुंबातर्फे आलेले सर्व गणेश भक्तांचे आभार मानण्यात आले. तसेच उमेश साळुंखे सतत आपल्या समाजकार्याच्या माध्यमातून नेहमी चर्चेमध्ये असतात. कुठल्याही प्रकारची समस्या असो ते लोकांसाठी रात्र दिवस मदतीला धावत असतात.

सर्वांना सुख-समृद्धी यश लाभो, येणारे वर्ष सर्वांना सुखी जावो अशी मनोकामना उमेश साळुंखे यांनी बाप्पा चरणी केली.



# रविवारी कल्याण पूर्वेत गरजवंत रुग्णांची गरज भागवण्यासाठी महारक्तदान शिबीराचे आयोजन

*कल्याण : गेली अनेक वर्षे सेवाभावी कार्यात अग्रेसर असलेल्या कल्याण पूर्वेतील मातोश्री गुंजाई फाऊंडेशन तसेच मयुरेश प्रतिष्ठाण या सेवा भावी संस्थेच्या माध्यमातून रविवारी कल्याण पूर्वेत महारक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे .*

*राज्यातील शासकीय तसेच खाजगी रुग्णालयांमध्ये उपचार घेत असलेले रुग्ण तसेच अपघात ग्रस्तांना आवश्यक असलेल्या विविध गटाच्या रक्तांचा मोठ्या प्रमाणावर तुटवडा भासत आहे, या तुटवड्याला अंशत: का होईना दिलासा देण्यासाठी आणि गंभीर स्वरूपातील आपग्रस्त रुग्णांचे प्राण वाचवण्यासाठी माजी नगरसेवक महेश दशरथ गायकवाड यांच्या पुढाकाराने या महारक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे .*

*पूणे लिंक रोड वरील मातोश्री गुंजाई चौकातील नगरसेवक जनसंपर्क कार्यालयात रविवार दि . ११ सप्टेंबर २०२२ रोजी सकाळी ९ . ३० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत हे महा रक्तदान शिबीर सुरु रहाणार आहे .*

*सामाजिक जाणिवेचे भान आणि गरजवंत रुग्णांची रक्ताची गरज भागवण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या महारक्तदान शिबीरात जास्तीत जास्त रक्तदात्यांनी रक्तदान करून रुणांप्रती आपली कृतज्ञता व्यक्त करण्याचे आवाहन मातोश्री गुंजाई फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष महेश गायकवाड यांनी एका निवेदनाद्वारे केले आहे .*

# अशोक मिरकुटे यांचे घरी पाच दिवस बाप्पाचे आगमन



**कल्याण :** बारवे गावचे ज्येष्ठ ग्रामस्थ तसेच कोळी महासंघाचे कल्याण भारतीय जनता पार्टीचे कल्याण जिल्हा मच्छीमार सेल तसेच कोळी महासंघाचे कल्याण तालुका अध्यक्ष अशोक मुरकुटे यांचे घरी पाच दिवस गणपती बाप्पाचे मोठ्या उत्साहात आगमन झाले. अनेक वर्षापासून अशोक मिरकुटे यांच्या घरी पाच दिवसांचा गणपती विराजमान असतो, भक्ती-भावाने आरती करत हे पाच दिवस उत्साहाने साजरे करण्यात येतात. तसेच अशोक मुरकुटे यांच्या वतीने सर्व नागरिकांसाठी सुख समृद्धी लाभो अशी देवचनी प्रार्थना करण्यात आली तसेच लोकांनी दर्शनाला यावे असे आव्हाहन देखील केले.

# राजन दुबे यांचे घरी पाच दिवसीय बाप्पाचे आगमन

**कल्याण :** समाजसेवक व उद्योगपती राजन दुबे यांचे निवासस्थानी पाच दिवसीय गणपती बाप्पाचे आगमन थाटात माटात भक्तीभावाने यांच्या जिंकली.

गेल्या दोन वर्षापासून कोरोनाचा प्रसार असल्याने कुठल्या प्रकारचा सण उत्साहात साजरा झाला नव्हता मात्र यावर्षी गणपती उत्सव



निवासस्थानी उत्साहात साजरा झाला.

यावेळी अनेक मान्यवरांनी येऊन बाप्पांचे दर्शन घेतले तसेच शेवटच्या दिवशी सत्यनारायणाची महापूजा भंडाराचे आयोजन करण्यात आले होते तसेच भजन मंडळाच्या गायनाने लोकांची मने मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. राजन दुबे व त्यांचे कुटुंबीयांतर्फे बाप्पा चरणी प्रार्थना करण्यात आले की हा वर्ष सर्वांना सुख समृद्धी लाभो यश लाभो आणि लोकांना आजार मुक्त ठेवा अशी मनोकामना करून प्रार्थना करण्यात आली.

# भक्तांना कुठल्याही प्रकारची गैरसोय होऊ नये - रोहिदास गायकर

**कल्याण :** सालाबाद प्रमाणे यंदाही श्रमिक युवक मंडळ आधारवाडी समितीतर्फे दीड रोहिदास गायकर परिश्रम घेतले आहे. तसेच प्रशासनाकडून सीसीटीव्ही कॅमेरे पोलीस बंदोबस्त होत नव्हता. मात्र यावर्षी लोकांनी सर्व सण साजरे केले आहे तसेच गणपती उत्सव देखील उत्साहाने साजरा होत



दिवसीय गणपती विसर्जन करण्याची सोय करण्यात आली आहे. भक्तांना कुठल्याही प्रकारची गैरसोय होऊ नये म्हणून समाजसेवक भारतीय जनता पार्टीचे इत्यादीवर चांगल्या पद्धतीने लक्ष देण्यात आलेल आहे. गणपती बाप्पाचा निरोप घेताना भक्तगण भावुक झाले होते. गेल्या दोन वर्षापासून कुठला प्रकारचा सण साजरा आहे. तसचे महिलांसाठी उभे राहण्याची ही व्यवस्था करण्यात आलेली आहे. निर्माल्य टाकण्यासाठी गाडीची व्यवस्था करण्यात आली आहे.

# जयंता पाटील यांचा पन्नास वां वाढदिवस त्यांच्या राहते घरी उत्साहात साजरा



**डोंबिवली :** आजदे गावचे माजी कार्यसम्राट सरपंच जयंता पाटील यांचा वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी त्यांना शुभेच्छा देण्यासाठी करिता अनेक मान्यवरांनी आपली हजेरी लावली तसेच त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. आलेले सर्व मान्यवरांचे आभार जयंता पाटील यांनी मानले. गेले अनेक वर्षापासून समाजामध्ये ते समाजकार्य करत आहेत. गेले दोन वर्षापासून पासून शहरांमध्ये कोरोनाचा प्रभाव होता यावेळी त्यांनी जनतेची भरपूर मदत केली. हे कार्य जनता कधीच विसरणार नाही.

Printed, Published, Owned & Editor - Rajendra Shrawan Vakhare, Printed At SIDDHAKALA PRINT MEDIA & PUBLICATIONS PVT.LTD., PLOT. No. W-230, TTC Industrial Area, Khairne MIDC, Navi Mumbai-Dist. Thane. MAHARASHTRA - 400710 Published From - Flat No 219, First Floor, L.I.G. Blg No 16, Opp - Birla College Chickanghar, Kokan Vasahat, Kalyan (w), Taluka - Kalyan, Dist - Thane. Pin Code - 421 301 - (Maharashtra) Mob. 09987496136, 09619630035, 08655004586 (REGD.NO. MAHBIL/2014/56983 Email - kalyandombivlivision@gmail.com

हे मराठी साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक श्री. राजेंद्र श्रावण वखरे यांनी सिध्दकला प्रिंट मिडीया, ॲण्ड पब्लिकेशन प्रा.लि.डब्ल्यू २३०, टीसीसी इंडस्ट्रियल एरिया खैरणे, एमआयडीसी ठाणे-बेलापूर रोड, नवी मुंबई -४००७१० जि. ठाणे - ४००७१०, येथे छापून फ्लॅट नं. २१९, पहिला मजला, एल.आय.जी. बिल्डींग नं. १६, बिर्ला कॉलेज समोर, चिकणघर, कोकण वसाहत, कल्याण (प.), ता. कल्याण, जि. ठाणे -४२१३०१ येथून छापून प्रकाशित केले (रजि. नं. एमएएचबीआयएल २०१४/५६९८३)